सकाळ

# युवा महोत्सवात कोरेगावच्या भोसले कॉलेजची बाजी

## सांगलीत ५ ऑक्टोबरपासून मध्यवर्ती महोत्सव; महावीर महाविद्यालय दुसरे

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. २८ : येथील महावीर महाविद्यालयात झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या ३८ व्या युवा महोत्सवात कोरेगावच्या डी. पी. भोसले कॉलेजने सर्वाधिक गुण मिळवत बाजी मारली. महावीर महाविद्यालय दुसऱ्या तर मुधोजी कॉलेज (फलटण) तिसऱ्या स्थानावर राहिले.

विलिंग्डन कॉलेज (सांगली), केआयटी कॉलेज (कोल्हापूर), आर. बी. माडखोलकर कॉलेज (चंदगड) या महाविद्यालयांनी अनुक्रमे चौथा, पाचवा व सहावा क्रमांक पटकावला.

सांगलीतील विलिंग्डन कॉलेजमध्ये पाच ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या मध्यवर्ती महोत्सवासाठी या महाविद्यालयांची निवड झाली.



कोल्हापूर : महावीर महाविद्यालयात झालेल्या युवा महोत्सवात नृत्य सादर करताना एका महाविद्यालयाचा संघ.

### विविध स्पर्धांचा अनुक्रमे निकाल असा...

- **मराठी वक्तृत्व** : डी. आर. माने कॉलेज (कागल), दूधसाखर महाविद्यालय (बिद्री), राजाराम महाविद्यालय (कोल्हापूर).
- **हिंदी वक्तृत्व**: जयसिंगपूर कॉलेज, गोखले कॉलेज (कोल्हापूर), राजर्षी शाहू कॉलेज (रुकडी).
- **इंग्रजी वक्तृत्व** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज (पेठवडगाव), दूधसाखर (बिद्री), सर्व अधिविभाग (शिवाजी विद्यापीठ).
- **वादविवाद** : न्यू कॉलेज, विवेकानंद कॉलेज, दूधसाखर (बिद्री).
- **लोककला** : दत्ताजीराव कदम कॉलेज (इचलकरंजी), सदाशिवराव मंडलिक कॉलेज (मुरगूड), शरद इन्स्टिट्यूट (यड्राव).
- **लोकनृत्य** : आजरा महाविद्यालय, शिवशाहू (सरूड), विवेकानंद कॉलेज.
- **लोकवाद्यवृंद** : विवेकानंद, आजरा महाविद्यालय, कॉमर्स कॉलेज.
- **समूहगीत** : सर्व अधिविभाग (शिवाजी विद्यापीठ), विवेकानंद, कॉमर्स कॉलेज.
- **नकला** : यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, आजरा महाविद्यालय, विवेकानंद कॉलेज.
- **एकांकिका** : शरद इन्स्टिट्यूट, विवेकानंद कॉलेज, दत्ताजीराव कदम कॉलेज (इचलकरंजी)
- **लघुनाटिका** : विवेकानंद, भारती विद्यापीठ, न्यू कॉलेज.
- **पथनाट्य** : डॉ. घाळी कॉलेज (गडहिंग्लज), भोगावती कॉलेज, कॉमर्स कॉलेज.
- **मूकनाट्य** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज (पेठवडगाव), विजयसिंह यादव कॉलेज (पेठवडगाव), श्रीमती आक्काताई पाटील कन्या महाविद्यालय (इचलकरंजी).
- **सुगम गायन** : राजाराम कॉलेज, विवेकानंद कॉलेज, आजरा महाविद्यालय.

लोकमत

## 'विलिंग्डन'मध्ये बुधवारपासून आयोजन

# सांगलीत विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली :** विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा व कॉलेज वर्तुळात आकर्षणाचे केंद्र असलेला शिवाजी विद्यापीठाचा ३८ वा मध्यवर्ती युवा महोत्सव बुधवार, दि. ३१ ऑक्टोबरपासून सांगलीत होत आहे. विलिंग्डन महाविद्यालयात तीन दिवस चालणाऱ्या या युवा महोत्सवाची जोरदार तयारी सुरु आहे.

३१ ऑक्टोबरते २ नोव्हेंबरअखेर होणाऱ्या या युवा महोत्सवासाठी खुला मंच, वेलणकर हॉल, कांतिलाल शाळा, अप्लाईड सायन्सेस इमारतीसह महाविद्यालय परिसरात रंगमंचाची व्यवस्था करण्यात आली आहे. सांगलीसह कोल्हापूर, सातारा जिल्ह्यातील सुमारे ८० महाविद्यालयांनी ३३ कलाप्रकारात आपला सहभाग नोंदविला आहे.

खा. संजय पाटील, आ. सुधीर गाडगीळ, महापौर संगीता खोत, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. रवींद्र गुरव यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे, तर शुक्रवारी पालकमंत्री सुभाष देशमुख, विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे. मध्यवर्ती युवा महोत्सव समितीच्या सदस्यांनी नुकतीच भेट देऊन पाहणी केली आहे. जिल्ह्यातील महाविद्यालयांनी महोत्सवात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्राचार्य भास्कर ताम्हनकर यांच्यासह युवा महोत्सव समितीने केले आहे.

### विविध कलाविष्कार

खुल्या रंगमंचावर सुगम गायन, लघुनाट्य, मूकनाट्य, एकपात्री अभिनय सादर होणार आहे, तर इतर ठिकाणी एकांकिका, शास्त्रीय नृत्य, प्रश्नमंजुषा, लोकवाद्यवृंद, मेहंदी, लोककला, वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी, स्पॉट फोटोग्राफी, पथनाट्य आदी कलाप्रकार सादर होणार आहेत.

सकाळ



**कोल्हापूर : महावीर महाविद्यालयात युवा महोत्सवाचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना खासदार धनंजय महाडिक. सोबत के. ए. कापसे, महावीर देसाई, अभिजित कापसे, प्राचार्य लोखंडे आदी.**

# कष्टाशिवाय कोणत्याही क्षेत्रात प्रगती नाही

## महाडिक; युवक महोत्सवाचे उद्घाटन

**कसबा बावडा, ता. २८ :** 'विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी युवक महोत्सवासारख्या गोष्टींची अत्यंत गरज आहे. जिद्द, चिकाटी आणि कष्टाशिवाय कोणत्याही क्षेत्रात प्रगती नाही,' असे प्रतिपादन खासदार धनंजय महाडिक यांनी केले. महावीर महाविद्यालय आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ३८ व्या जिल्हास्तरीय युवक महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ॲड. के. ए. कापसे हे होते. महोत्सवात कोल्हापुरातील सर्व महाविद्यालयांतून सुमारे अडीच हजार विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

ॲड. के. ए. कापसे म्हणाले, ''लोकांमध्ये चैतन्य निर्माण करण्यासाठी युवा महोत्सवाची गरज आहे.'' या वेळी संस्थेचे सचिव महावीर अण्णा देसाई, प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे, डॉ. महेश काकडे, कुलसचिव डॉ. विलास नांदीवडेकर, डॉ. आर. व्ही. गुरव, ॲड. अभिजित कापसे, गुणवंत रोटे, सुषमा रोटे, प्रदीप पाटील, डॉ. अरुण पाटील, डॉ. शरद गायकवाड, डॉ. गोमटेश्वर पाटील आदी उपस्थित होते.

Kolhapur, Kolhapur-Today
29/10/2018 Page No. 6

लोकमत

## शुभदा दिवाण : शिवाजी विद्यापीठातील समुपदेशन कार्यशाळा

# मानसिकता समजण्याचे कौशल्य हवे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** समुपदेशकाजवळ सल्लार्थ्यांची मानसिकता समजून घेण्याचे कौशल्य हवे. त्याच्या समस्येची कारणे शोधण्यात त्याला मदत करता आली पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. शुभदा दिवाण यांनी बुधवारी (दि. २४) येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर करिअर गाईडन्स अँड सायकॉलॉजिकल कौन्सेलिंगच्यावतीने विद्यापीठातील शिक्षकांसाठी आयोजित केलेल्या समुपदेशन कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळेत त्या बोलत होत्या.

डॉ. दिवाण म्हणाल्या, सध्याच्या काळात विद्यार्थ्यांच्या मानसिक समस्या वाढलेल्या आहेत. पूर्वी घरातील पुरुषाला सर्व काही मिळत असे. आज घरातील मूल हे केंद्रस्थानी आहे. मुलाला हवे ते लगेच मिळत जाते. त्यामुळे ते आत्मकेंद्री बनत आहे. त्याचा नकारात्मक परिणाम असा की, जेव्हा हवी ती गोष्ट त्याला मिळत नाही, तेव्हा त्याचे मानसिक संतुलन बिघडते. त्यामुळे समुपदेशकाजवळ सल्लार्थीची मानसिकता समजून घेण्याचे कौशल्य हवे. यावेळी विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी स्वागत केले. डॉ. जी. एस. पाटील यांनी आभार मानले.

Kolhapur Main
Page No. 7 Oct 29, 2018
Powered by: erelego.com